अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## त्या प्रेमीयुगलांच्या रिमोर्ट कंट्रोलचा शोध सुरू : पो.नि. दादा गायकवाड

**सोलापूर :** शहरात गाजलेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणात, विजापूर नाका पोलिसांनी सखोल तपास करून फिर्यादी व तिचा म्रियकर या दोघांना आरोपी करून अटक केली. या गुन्ह्यात पोलिसांनी अटक केलेल्या फिर्यादी व तिचा प्रियकर या दोघांना कोर्टापुढे उभे केले असता न्यायाधिशांनी त्या प्रेमियुगलांना न्यायालयींन कोठडी सुनावली.

**त्या प्रेमीयुगलांना मिळाली न्यायालयीन कोठडी**

या गुन्ह्यात त्या प्रेमीयुगलांना सामुहिक बलात्काराची फिर्यादी दाखल केल्यानंतर भादवि कलम ३०६ च्या गुन्हयात तिच्या प्रियकराला मदत होईल. असा सल्ला देणारा मास्टर माईंड कोण आहे. याचा शोध पोलीस सुरू आहे. अशी माहिती विजापूर नाका पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड यांनी सुराज्यशी बोलताना दिली.

आपला प्रियकर समीर शेख याच्याविरूध्द भादवि कलम ३०६ अन्वये आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर समीर याला गुन्ह्यात मदत व्हावी. या उद्देशाने समीरच्या प्रेमात बुडालेल्या त्याच्या प्रियसीने, ज्या फिर्यादी व त्यांच्या साक्षीदारांनी समीर शेख विरूध्द केस दाखल केली. त्या चौघांविरूध्द सामुहिक बलात्कार केल्याची फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्यात पोलिसांनी त्या चौघांना ताब्यात घेतले होते.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १७४ वा किंमत : ५ रुपये पाने १२

# हिप्परगा तलावात दोन तरुण बुडाले : एकाचा मृतदेह सापडला, दुसऱ्याचा शोध



**सोलापूर/प्रतिनिधी**

हिप्परगा तलावामध्ये दोन मुले बुडाली. याची खबर मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली, व स्थानिक लोकांच्या मदतीने भारत शिवशंकर सुरवसे (वय २८ रा. जोशीगल्ली, शेळगी) याला तलावातुन बाहेर काढले. व त्याला शासकीय रूग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. याची नोंद तालुका पोलीस ठाण्यात झाली आहे. तर दुसऱ्याचा शोध सुरू आहे. अशी माहिती, तालुका पोलीस ठाणयाचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे व पोलीस कॉन्टेबल अकबर शेख यांनी 'सुराज्य'शी बोलताना दिली.

हिप्परगा तलावात दोन तरुण बुडाले आहेत. अशा खबर, तालुका पोलिसांना दि. २३ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास समजली. तेंव्हा तत्काळ तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे व कॉन्स्टेबल अकबर शेख व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. व स्थानिक लोकांच्या मदतीने बुडालेल्या दोन्ही मुलांचा शोध घेतला. तेंव्हा सायंकाळी ७.२० वाजण्याच्या सुमारास भारत शिवशंकर सुरवसे (वय २८ रा. जोशीगल्ली, शेळगी) हा हिप्परगा तलावात पाण्यावर तरंगताना मिळून आला. पोलिसांनी त्याला शासकीय रूग्णालयात मंथन सुरवसे याने दाखल केले असता भारत सुरवसे हा याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे. तर तालुका पालीस दुसऱ्या मुलाचा शोध घेत आहेत. त्यानंतर अंधार झाल्याने शोध कार्य थांबविण्यात आले.

भारत सुरवसे व दुसरा मुलगा हे दोघे हिप्परगा तलावाकडे का आणि कशासाठी गेले होते, ते तलावात कसे बुडाले. या व अशा प्रश्नांची उत्तरे पोलीस तपास निष्पन्न होतील. तर दि. २४ मार्च रोजी सकाळी तालुका पोलिस पुन्हा घटनास्थळी जावून दुसऱ्या मुलाचा शोध घेणार आहेत. याची नोंद तालुका पोलिस ठाण्यात झाली आहे.

# साताऱ्याची धग हाऊसमध्ये धुमसली

- भाईंनी मित्र पक्षालाच लगावले टोले
- एसपींच्या निलंबनावरून भाजप आक्रमक

**मुंबई/प्रतिनिधी**

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेना या मित्रपक्षांमध्ये झालेली झटापट आणि सदस्यांची झालेली फोडाफोडी तसेच साताऱ्याचे पालकमंत्री तथा शिंदेसेनेचे नेते शंभूराज देसाई यांना झालेल्या धक्काबुक्की प्रकरणाचे सोमवारी विधानसभेत तीव्र पडसाद उमटले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच भाजपवर टीकेची झोड उठवली. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच सदस्यांना मतदान करू न दिल्याचा प्रकार घडला असून लोकशाही गळा घोटण्याचे काम साताऱ्यात पोलीस प्रशासनाकडून करण्यात आल्याचा संताप शिंदे यांनी आक्रमक शैलीत व्यक्त केला.

दरम्यान विधानपरिषदेतही गदारोळ झाल्यानंतर उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यांनी साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना निलंबित करण्याचा आदेश देवून भाजपला दणका दिला. शिंदेंच्या आक्रमक भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत भूमिका मांडत चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)



### परब यांनी जखमेवर मीठ चोळले

सत्ताधारी मंत्र्यांना पोलिसांनी मारहाण केली. सत्ताधारी मंत्री पोलिसांचा मार खातायत,सत्तेतले कार्यकर्ते मार खातायेत.तरीही शिंदे सेनेचे नेते शेपूट घालून बसले,अशा शब्दात उद्धव ठाकरे सेनेचे आमदार अनिल परब यांनी शिंदे सेनेच्या जखमेवर मीठ चोळले. तुम्ही उठाव कशासाठी केला? आम्ही वाघाचे बच्चे आहोत, पण आज भारतीय जनता पक्ष तुम्हाला चिरडून काढते आणि तुम्ही भारतीय जनता पक्षाचे नाव घ्यायला देखील घाबरताय, असे म्हणत परब यांनी टोला लगावला.

### परबांना दिले प्रतिटोले

उदय सामंत म्हणाले की, अनिल परब यांनी शेपटी घातली असा उल्लेख केला. ज्यावेळी आम्ही मुंबईमध्ये उठाव करून आलो, त्यावेळी हे आमचे कोथळे काढणार होते, त्याला आम्ही घाबरलो नाही. हे आम्हाला वरळीवरून यायला देणार नव्हते. शेपटी घालण्याच्या गोष्टी यांनी आम्हाला शिकवू नयेत, शंभूराज देसाई म्हणाले की, उठाव करताना सुद्धा काय वाक्य वापरली होती? यांची प्रेते येतील, कोथळे काढू, पण खुलेआम आलो, ना आम्ही विमानाने आलो, उतरलो, बसने आलो, विधानभवनला गेलो. त्यामुळे आमच्या धाडसाचे विनाकारण तुम्ही आम्हाला डिवचायचा प्रयत्न करू नका.

### सेनेच्या मंत्र्यांनी मांडली कैफियत

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत झालेल्या नाट्यमय राजकीय घडामोडींनंतर सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेतील संघर्षाने टोक गाठले आहे. सभागृहातील कामकाजानंतर शिवसेनेच्या मंत्र्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेत आपली खदखद व्यक्त केल्याची माहिती आहे.

### गोरेंकडून एसपींची पाठराखण

सातारा पोलीस अधीक्षकांबाबत विधानपरिषदेत मंत्र्यांनी आक्रमक भूमिका मांडल्यानंतर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या निलंबनाचे आदेश दिले. मात्र वस्तुस्थिती जाणून न घेता निलंबन करणे चुकीचे असल्याचे सांगत मंत्री जयकुमार गोरे यांनी अधीक्षकांची पाठराखण केली.

### निलंबनावरून संघर्ष चिघळणार

नियमानुसार उपसभापतींनी सभागृहात पिठासीन अधिकारी म्हणून दिलेला निर्णय हा सभापती सामान्यतः बदलू शकत नाही. जेव्हा उपसभापती सभागृहाचे कामकाज चालवतात तेव्हा त्यांना सभापतीप्रमाणे सर्वाधिकार असतात. उपसभापतींनी दिलेल्या निर्णयाला सभापतीकडे अपील करता येत नाही. त्यामुळे उपसभापतींचा निर्णय त्यावेळी अंतिम मानला जातो. उपसभापती हे सभापतींच्या अधीन नसून थेट सभागृहाला जबाबदार असतात. विशेष परिस्थितीत जरी निर्णय बदलता येत नसला तरी, जर उपसभापतींचा निर्णय कायदेशीर किंवा घटनात्मक नियमांच्या विरोधात असेल, तर न्यायालयीन पुनरावलोकनाचा विषय होऊ शकतो, परंतु सभापती स्वतःहून तो निर्णय बदलू शकत नाहीत. त्यामुळे आता गोऱ्हे यांनी दिलेल्या निर्देशानंतर भाजपची अडचण वाढली आहे.

# अंधारलेली रात्र... रातकिड्यांचे आवाज...

## २० फुटी नाग 'ओस्नो' जलाची गाज!

## दाक्षिणात्य चित्रपटाला लाजवणारा भोंदू बाबाचा माज



**नाशिक/प्रतिनिधी**

**बलात्काराचे आरोप असलेला भोंदूबाबा अशोक खरात कशा पद्धतीने अघोरी कृत्य करून महिलांना आपल्याकडे आकर्षित करत पैसेही उकळायचा याची एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. एखाद्या दक्षिणात्य चित्रपटाच्या कथनाकालाही लाजवेल अशा पद्धतीने तो चमत्कार घडवून आणायचा. विशिष्ट दिवशी रात्रीच्या वेळी तो जंगल परिसरात २० फुटी नाग आणि वाघाचा डुप्लीकेट थरार दाखवायचा. चक्क नाग डुलत येत असल्याने उपस्थित सगळेच आचंबित आणि गर्भगळित व्हायचे. नागला मी वश करु शकतो, असं भासवायचा आणि त्याच्या या चमत्काराला सगळे भुलायचे आणि भोंदू अशोक खरातच्या अंगात दैवी शक्ती आहे, असे समजून त्याच्या अघोरी कृत्यांना साथ द्यायचे. त्याच्या या चत्मकाराची आणि एकूणच लोक भूलण्याची 'कुंडली' चौकशीतून समोर आली आहे.**

### खरात भाविकांना कसं गंडवायचा?

अंधारलेली रात्र.... जंगलातले रातकिड्यांचे आवाज..... मंत्रांचे उच्चार.... अशा अंधाऱ्या रात्री अशोक खरात त्याच्या भाविकांना जंगलात बोलवायचा. भाविक तिथे आले की खरात तंत्र-मंत्र करायचा आणि त्यानं इशारा केला की २० फुटांचा एक मोठ्ठा नाग सळसळ करत यायचा. फणा काढायचा.... खरात जसे इशारे करेल तसं हा नाग करायचा आणि खरातनं जाण्याचा इशारा केला की नाग निघून जायचा. खरातकडे आलेले भाविक हा प्रकार पाहून थक्क व्हायचे आणि खरातच्या चमत्कारांवर त्यांचा विश्वास बसायचा. हा नाग म्हणजे भाविकांना गंडवण्यासाठीची मोडस ऑपरेंटी होती. पोलिसांनी खरातला ताब्यात घेतलं आणि नागाला स्वतःच्या इशाऱ्यावर नाचवणारा खरात पोपटासारखं बोलू लागला. त्यातूनच उघड झालं या नागाबद्दलचं सत्य.

### 'ओस्नो' जलाचा उपयोग

भोंदूबाबा हा व्हायग्रा गोळ्यामिश्रित पाणी पीडितांना द्यायचा. ज्याला तो ओस्नो जल आहे असे सांगायचा. हा भोंदूबाबा अशोक खरात ओस्नो तयार करायचा. श्रावणातले चार सोमवार आणि महाशिवरात्रीला हे ओश्नो प्राशन करायला लावायचा. ओम इशनेश्वरराय नमः हा जप करायला सांगायचा.

### २० फुटी सापाच्या माध्यमातून चमत्कार...


एखाद्या दक्षिणात्य चित्रपटाच्या कथनाकालाही लाजवेल अशा पद्धतीचा चमत्कार घडवून आणत अशोक खरात हा भक्तांना वेड्यात काढत त्यांच्याकडून पैसे उकळत होता. सिन्नर तालुक्यातील मिरगावमध्ये बाबाचे हे ईशान्येवर महादेव मंदिर आहे आणि याच मंदिरात तो भक्तांना रात्रीच्या वेळी बोलवत अघोरी कृत्य करायचा. रिमोट कंट्रोलच्या आधारे नकली प्लास्टिकच्या २० फुटांच्या सापाच्या हालचालींनी चमत्कार दाखवत लोकांची फसवणूक करायचा. पूजा सुरु झाली की तंत्र मंत्र करीत भल्या मोठ्या नागाला तो स्वतः कडे बोलवायचा. नागदेखील सरपटत त्याच्यासमोर येऊन फणा काढून उभा राहायचा... सापासोबतच वाघाची कातडीही समोर यायची आणि ही सर्व दृश्य बघून बघून उपस्थित भाविकांची बोलतीच बंद व्हायची. खरात सांगेल त्या पद्धतीने नाग हालचाली करायचा. त्यानंतर खरातच्या आदेशावरून साप निघून जायचा. हा सर्व प्रकार झाल्यानंतर खरात भाविकांना मी नागाला वशमध्ये केल्याची बतावणी करायचा. खरातचा हा चमत्कार बघून सगळे प्रभावित व्हायचे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

सोलापूर शहराचे
**तापमान**
कमाल तापमान
**३७.६**

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




असे अस्त्र असायला हवे !

| कल्याण |
|---|
| 399-17-278 |

| मुंबई |
|---|
| 130-41-678 |

3 9 7

## डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण

# आरोपी मनिषा मुसळे-माने हिच्या दोषमुक्ती अर्जावर युक्तिवाद पूर्ण


## आज निकाल लागण्याची शक्यता

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यात गाजलेल्या डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणी सोमवारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या न्यायालयात, आरोपी मनीषा मुसळे- माने हिच्या दोषमुक्ति अर्जावर, दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तिवाद पूर्ण झाला. या प्रकरणात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर करण्यासाठी मनीषा मुसळे यांचे वकिल प्रशांत नवगिरे यांनी दि. २४ मार्च रोजी मंगळवारी तारीख मागितली. ती कोर्टाने मान्य केली. मंगळवारी आरोपी मनीषा मुसळे-माने हिच्या दोषमुक्ति अर्जावर निर्णय होवू शकतो.

डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात सरकारी वकिल आनंद कुर्डूकर यांनी युक्तिवाद केला कि, मनीषा मुसळे-माने विरूध्द एफआयआरमध्ये थेट आरोप नमूद आहेत आणि तिने पाठविलेल्या मेलमुळे डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या केली.


डॉ. शिरीष वळसंगकर


मनीषा मुसळे

सरकार पक्षाकडे आरोपी मनीषा मुसळे विरूध्द पुरेसा पुरावा आहे. त्यामुळे दोषमुक्तींचा अर्ज नामंजुर करावा. यानंतर आरोपी मनीषा मुसळे हिचे वकिल प्रशांत नवगीरे यांनी आपल्या युक्तिवादात म्हटले कि, तथाकथीत वादाची सुरूवात ही दि. १७ एप्रिल २०२५ रोजी झाली. ज्यावेळी मनीषा हिने डॉ. शिरीष वळसंगकर व त्यांच्या परिवारास मेल पाठविला. व त्यामध्ये तिने त्यांच्यावर आरोप केले, परंतु सदरील मेलची पत्र पाहता त्यामध्ये एकही वाक्य डॉ. शिरीष वळसंगकर यांची बदनामी करण्यासारखे नव्हते. अथवा त्या मेलचा उद्देश डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या करावी असा नव्हता. सदरील केस वरून दिसून येते कीं, केवळ मनीषा हिंने कामाच्या ठिकाणी होत असलेल्या त्रासाबद्दल व्यथा तिच्या मालकाकडे मांडली होती. सदरील मेल प्राप्त झाल्यानंतर डॉ. शिरीष वळसंगकर यांनी देखील समजूतदारपणे मनीषा हिस बोलावून घेतले. तिची समजूत काढली व मनिषाने देखील डॉ. वळसंगकर यांची माफी मागितली. व माफिनामा लिहून दिला. यावरून दिसून येते की, डॉ. वळसंगकर यांना विश्वास होता कीं, मनिषा ही आपली जुनी कामगार आहे. ती आपल्या शब्दाच्या बाहेर नाही व त्याच प्रमाणे मनीषाचे देखील डॉ. वळसंगकर यांच्याबद्दल आदराचे वागणे होते.

त्यामुळे दि. १७ एप्रिल २०२५ रोजी पाठविलेल्या मेलमुळे डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या केली अथवा डॉक्टरांनी करावी, असा मनिषाचा उद्देश होता हे दिसून येत नाही तसेच डॉ. वळसंगकर यांनी दि. १८ एप्रिल २०२५ रोजी ८.४० वाजता आत्महत्या केली. तथाकथीत माफिनाम्यानंतर २५ तासांनी डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या केली. या दरम्यान डॉ. वळसंगकर यांना इतर अनेक पर्याय उपलब्ध होते. जर मनीषामुळे डॉक्टरांना मानसिक त्रास झाला असेल तर त्यांनी पोलीस कम्पेंट केली असती अथवा मनीषाला कामावरून काढून टाकले असते. त्यामुळे आत्महत्या करणे हा एकमेव पर्याय त्यांच्याकडे होता, असे म्हणता येणार नाही.

तसेच सरकार पक्षाच्या कथनानुसार शवविच्छेदनाच्या वेळी डॉक्टरांच्या कपड्यामध्ये सुसाईड नोट सापडली, परंतु कपडे जप्ती पंचनामा हा दि. १९ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आला. कपडे हे दि. १८ एप्रिल २०२५ रोजीच पोलिसांनी जप्त केले होते. शवविच्छेदन अहवालात मयताच्या अंगावर कपडे नव्हते. त्यामुळे सुसाईड नोट ही प्लांट केली असण्याची शक्यता दिसून येते. या सुसाईड नोटचा संबंध मनीषाशी येत नाही. मनीषामुळे अथवा तिच्या कोणत्याही कृत्यामुळे डॉक्टरांनी आत्महत्या केली, असा कोणताही पुरावा दोषारोपपत्रात दिसून येत नाही. तिच्याविरूध्द दोष निश्चिती करण्याइतपत पुरावा नाही. त्यामुळे मनीषा मुसळे हिला दोषमुक्त करावे. असा युक्तिवाद ॲड. प्रशांत नवगिरे यांनी केला.

### आज उच्च न्यायालयाचे निवाडे सादर करणार : ॲड. नवगिरे

डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी मनीषा मुसळे हिच्या दोषमुक्ती अर्जावर युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर, आरोपी मनिषाचे वकील नवगिरे यांनी कोर्टात उच्च न्यायालय व सर्वाच्च न्यायालयाचे निवाडे सादर करण्यासाठी दि. २४ मार्च ही तारीख मागितली. ती कोर्टाने मान्य केली. त्यामुळे निवाडे सादर केल्यानंतर, मनीषा मुसळे हिच्या दोषमुक्ती अर्जावर निकाल लागू शकतो.